महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

पुविमं/लेखा-३/दुष्काळग्रस्त फी माफी /२०२६/ 10577
पुणे-४११००५
दिनांक : २७/१०/२०२६
30/10/2026

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

---

विषय : राज्यात सन २०२६ च्या दुष्काळामुळे बाधित ३०५ तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांना फेब्रु/मार्च २०२७ च्या परीक्षेकरिता परीक्षा शुल्क माफ करणेबाबत ...

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक : एफ इ डी १५९२/१२०२/[११३२]साशि-५ मुम्बै३२, दि. १८ ऑक्टोबर १९९३
२. मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र. क्र.८२/मदत-२ दिनांक २५/०९/२०२६
३. शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र. क्र. ६१/एसडी-५, दि. ०५ ऑक्टोबर २०२६
४. क्र.रा.मं./लेखा/ दुष्काळग्रस्त फी माफी/२६-२७/४०४४ दिनांक २९/०९/२०२६
५. मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र. क्र.८२/मदत-२ दिनांक १४/१०/२०२६
६. शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र. क्र. ६१/एसडी-५, दि. २३ ऑक्टोबर २०२६
७. क्र.रा.मं./लेखा/ दुष्काळग्रस्त फी माफी/२६-२७/४५५० दिनांक २४/१०/२०२६

उपरोक्त संदर्भिय क्रमांक ७ च्या पत्रान्वये राज्य मंडळाने संदर्भिय क्रमांक ५ च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झालेल्या ३०५ तालुक्यांमधील शासकीय/खाजगी अनुदानित/विनानुदानित, स्वयं अर्थसहाय्यीत माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत कळवले आहे.

त्यानुसार, सर्व शासकीय/खाजगी अनुदानित/विनानुदानित, स्वयं अर्थसहाय्यीत माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयानी फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस प्रविष्ट सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरत असताना राज्य मंडळाच्या सोबत जोडलेल्या संदर्भ क्र. ७ च्या पत्रामधील अ. क्र. १ ते १२ मधील निर्देशांनुसार कार्यवाही करावी.

Digitally signed by
MINAKSHI BHARAT RAUT
Date: 30-10-2026
10:42:15

(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे

सोबत : १. शासन निर्णय प्रत
२. राज्य मंडळाचे संदर्भ क्र. ७ चे पत्र

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

स.न.८३२ ए, सारथी कार्यालयाजवळ, फायनल प्लॉट
नं. १७८, १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे-४११००४.

Maharashtra State
Board of Secondary & Higher
Secondary Education, Pune

S.R.No.832-A, Near Sarthi Office, Final Plot No.178,179,
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune- 411 004.

☎ Phone No.020-25705000 • Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा. मं./लेखा /दुष्काळग्रस्त फी माफी- २६-२७/4550
दि.२४/१०/२०२६

प्रति,

विभागीय सचिव ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय:-** राज्यात सन २०२६ च्या दुष्काळामुळे बाधित तालुक्यातील विद्यार्थ्यांना फेब्रु /मार्च २०२७ च्या परीक्षेकरीता परीक्षा शुल्क माफ करणेबाबत ....

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्रमांक :एफ ई डी १५९२/१२०२/[११३२] साशि-५ मुंबई ३२,दि.१८ ऑक्टोबर १९९३

२) मदत व पुनर्वसन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक : समिती-२०२६ /प्र.क्र..८२/मदत-२ दि.२५ सप्टेंबर २०२६

३) शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र. क्र.६१/एसडी-५. दि.०५ ऑक्टोबर २०२६

४) या कार्यालयाचे पत्र क्र. रा. मं./लेखा /दुष्काळग्रस्त फी माफी- २६-२७/ ४०४४ दि.२९/०९/२०२६

५) मदत व पुनर्वसन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि.१४/१०/२६

६) शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र. क्र.६१/एसडी-५. दि.२३ ऑक्टोबर २०२६

उपरोक्त विषयास अनुसरून व संदर्भिय शासन निर्णय क्र.०५ अन्वये राज्यातील ३०५ तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला आहे. सदर दुष्काळग्रस्त ३०५ तालुक्यामधील राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय झालेला आहे. शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रु /मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या इ १० वी व इ १२ वी परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून न घेता आवेदन पत्रे भरून घेण्यात यावीत. सदर आवेदन पत्रे भरताना विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी माफी योजने अंतर्गत शासन निर्णय दि.१८.१०.१९९३ मधील निकषांमध्ये केवळ या आर्थिक वर्षात एक विशेष बाब म्हणून शिथिलता देऊन योजनेची व्याप्ती वाढविण्यात येत आहे. त्यानुसार आवेदन पत्र भरत असताना परीक्षा शुल्क माफ करण्यासाठी आपल्या कार्यकक्षेतील दुष्काळग्रस्त तालुक्यातील खालील प्रमाणे विद्यार्थ्यांची फी माफीची कार्यवाही पुढीलप्रमाणे करण्यात यावी.

१. दि. १४ ऑक्टोबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या राज्यामध्ये दुष्काळग्रस्त भागामध्ये आपत्तीची परिस्थिती उद्भवलेल्या दुष्काळग्रस्त एकूण ३०५ तालुक्यातील मंडळाच्या माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२७ मधील परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यास परीक्षा फी माफीचा लाभ देण्यात येणार आहे.

२. दुष्काळग्रस्त एकूण ३०५ तालुक्याव्यतिरिक्त इतर सर्व तालुक्यातील विद्यार्थ्यांनी विहित पद्धतीनुसार व विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.

३. सदर योजना शासकीय / खाजगी अनुदानित / विना अनुदानित, स्वयं अर्थसहाय्यीत माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

४. जे विदयार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील [रिपिटर] अशा विद्यार्थ्यांना सुध्दा लागू राहील.

५. जे विदयार्थी बहिःस्थ (एक्सटर्नल) म्हणून नोंदले असतील अशा विद्यार्थ्यांना सुध्दा लागू ग़ाहील.

६. शहरी भागात वास्तव्यास असलेले, परंतु दुष्काळग्रस्त तालुक्यातील शेतजमीन असणाऱ्या पालकांचे विद्यार्थी पाल्य यांना सुध्दा लागू राहील.

७. शिक्षणासाठी अन्य ठिकाणी /शहरात वास्तव्यास असलेले, परंतु मूळ गाव दुष्काळग्रस्त तालुक्यात असलेले विद्यार्थी यांना सुध्दा लागू राहील.

८. दुष्काळग्रस्त / टंचाईग्रस्त भागातील इ.१०वी व १२वी च्या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील विद्यार्थांची आवेदन पत्रे सुध्दा परीक्षा शुल्क न घेता भरून घेण्यात यावीत त्यांचे परीक्षा शुल्क हे शासनाच्या संबंधीत विभागाकडून एकत्रित प्रस्ताव पाठवून राज्य मंडळा मार्फत घेण्यात येणार आहे.

९. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), विभागीय शिक्षण उपसंचालक आणि विभागीय सचिव, विभागीय मंडळ यांनी वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये आवेदन पत्रे भरून घेण्याबाबत पाठपुरावा करण्याबाबत विभागीय मंडळ स्तरावरुन सूचित करावे

**१०. मुख्याध्यापकांनी आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही 7 दिवसात करण्याबाबत त्यांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे. दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांचे माहिती भरण्यासाठी Institute Login मध्ये Application = Drought Entry / दुष्काळग्रस्त नोंद या option मध्ये माहिती भरावी.**

११ दुष्काळग्रस्त भागातील सवलतीस पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरणा केली असेल अशा विद्यार्थ्यांचा शुल्क परतावा रक्कम विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आधार संलग्न Bank Account मध्ये वर्ग करण्यात येणार असल्याने, विद्यार्थ्याच्या आधार क्रमांकाशी संलग्न बँक खात्याची माहिती उपलब्ध न झाल्यास अथवा चुकीची माहीती अथवा चुकीचा आधार क्रमांक दिल्यास सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार असल्याने परिपूर्ण माहिती निर्धारित कालावधीमध्ये भरण्याची दक्षता घेण्यात यावी, ही जबाबदारी पूर्णतः संबधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

**१२. ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क शाळा/क.महाविद्यालयांनी जमा करून घेतलेले आहेत,तथापि मंडळाकडे भरणा केलेला नाही,असे जमा केलेले शुल्क त्यांचे स्तरावर विद्यार्थ्यांना तात्काळ परत करावे. ही जबाबदारी पूर्णतः संबधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.**

उपरोक्त प्रमाणे निकषांची व अन्य आवश्यक बाबींची संदर्भीय शासन निर्णयानुसार खात्री करून घेण्यात यावी. व त्यानुसार सदरील योजनेची अंमलबजावणीसाठी विहित मुदतीत विद्यार्थ्यांचे आवेदन पत्रे भरून घेण्यात यावीत, सर्व संबंधीताना आपल्या स्तरावरून सूचित करावे. व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**(मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने)**

Mali

**(डॉ. दिपक माळी)**
**सचिव,**
**राज्यमंडळ, पुणे-०४**

**प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी :-**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन ,मंत्रालय, मुंबई ३२.मा.आयुक्त (शिक्षण),
२. शिक्षण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. मा. श्रीम. पल्लवी बच्छाव , कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

**सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) आणि Trigger-२ (दुसरी कळ) लागू झालेल्या ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## मदत व पुनर्वसन विभाग

**शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक :- १४ ऑक्टोंबर २०२६

**वाचा**:- १) शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि.०७ ऑक्टोबर, २०१७
२) शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि. २८ जून, २०१८
३) शासन पत्र क्रमांकः एससी वाय-२०२१/प्र.क्र.१००/म-७, दि. १८ ऑक्टोबर, २०२१
४) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि. ३१ ऑक्टोबर, २०२३
५) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २२ सप्टेंबर, २०२६
६) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २५ सप्टेंबर, २०२६
७) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २९ सप्टेंबर, २०२६
८) मा. मंत्रिमंडळ उपसमिती दि. २९.०९.२०२६ बैठक इतिवृत्त
९) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. ०४ ऑक्टोंबर, २०२६

**प्रस्तावना:**

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. २०२६ च्या खरीप हंगामातील परिस्थितीच्या आधारे Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेले २६५ तालुके संदर्भ क्र. ६ अन्वये दुष्काळी तालुके म्हणून घोषित करण्यात आले होते. आत्ता खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे Trigger-१ (प्रथम कळ) व Trigger-२ (दुसरी कळ) यावरून दिसून येते. तसेच राज्यात दि. ५ ऑक्टोंबर २०२६ नंतर पावसाळा संपलेला आहे. त्यामुळे राज्यात आत्ता एकूण अंतिमत: ३०५ दुष्काळी तालुके घोषित करणे व या तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते आज पर्यंत (दि. ५ ऑक्टोंबर, २०२६ नंतर पावसाळा संपलेला आहे.) या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यातील Trigger-१ (प्रथम कळ) आणि Trigger-२ (दुसरी कळ) बाबत प्राप्त झालेल्या माहिती नुसार अंतिमत: ३०५ तालुके हे दुष्काळी तालुके म्हणून जाहीर करण्यात येत आहेत. सदर अंतिमत: जाहिर झालेल्या ३०५ दुष्काळी तालुक्यांमध्ये पंचनामे करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुरु करावी. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल आयुक्त, कृषी यांच्या मार्फत शासनास तात्काळ सादर करण्यात यावा.

२. राज्यातील परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्यानुसार जाहीर केलेल्या एकूण अंतिमत: ३०५ तालुक्यांना राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) जमीन महसूलात सूट

२) पिक कर्जाचे पुनर्गठन

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती

४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल)

५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी

६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे

९) शेतीवर आश्रित शेतकरी/मजूर इत्यादी यांना अन्न धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे

१०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे

११) जलसंधारणाची कामे सुरु करणे

१२) अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे.

३. सदर अंतिमत: जाहीर केलेल्या ३०५ दुष्काळी तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहीत कार्यपध्दतीची पूर्तता करुन स्वतंत्र शासन निर्णयान्वये जाहीर केली जाईल.

४. या आदेशान्वये देण्यात येणा-या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. त्यानुसार या प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१४१२५५५३४३४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.10.14 12:57:10 +05'30'

**(सुनिल स. सामंत)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल. मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
६) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुबई
९) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी, मंत्रालय, मुंबई
११) अप्पर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुबई
१३) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), पाणी पुरवठा विभाग, जी. टी हॉस्पीटल, मुंबई
१६) प्रधान सचिव (मृदु व जलसंधारण), मृदु व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुबई
१७) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) प्रधान सचिव (ऊर्जा),, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) सर्व विभागीय आयुक्त
२०) सर्व जिल्हाधिकारी
२१) आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

२३) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
२५) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
२६) सर्व सहसचिव/उपसचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासन इमारत, मंत्रालय, मा
२८) महसूल व वन विभाग, कार्यासन क्रमांक मदत-१/मदत-३
२९) निवडनस्ती (कार्यासन मदत-२)

**शासन निर्णक क्र.समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दिनांक १४.१०.२०२६ सोबतचे**

**परिशिष्ट-१**

**खरीप हंगाम २०२६-प्रथम कळ (Trigger-१) व दुसरी कळ (Trigger -२) लागू झालेल्या तालुक्यांची यादी**

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-१) व दुसरी कळ (Trigger -२) लागू झालेले तालुके | तालुक्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| कोकण | १ | ठाणे | निरंक | ० |
| | २ | पालघर | जव्हार, मोखाडा, तलासरी | ३ |
| | ३ | रायगड | श्रीवर्धन | १ |
| | ४ | रत्नागिरी | रत्नागिरी, संगमेश्वर, राजापूर, लांजा, मंडणगड, खेड | ६ |
| | ५ | सिंधुदुर्ग | सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला | ८ |
| नाशिक | ६ | नाशिक | मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा, त्र्यंबकेश्वर, चांदवड व निफाड | १३ |
| | ७ | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर | ४ |
| | ८ | जळगांव | एरंडोल, पारोळा, धरणगाव, चोपडा, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, | १५ |
| | ९ | नंदुरबार | अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी | ६ |
| | १० | अहिल्यानगर | अहिल्यानगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता | १४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पुणे | ११ | पुणे | भोर, वेल्हे, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर,आंबेगाव,जुन्नर | १० |
| | १२ | सोलापूर | उ. सोलापूर, द. सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा | ११ |
| | १३ | सांगली | मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ,शिराळा,वाळवा, खानापूर, विटा, तासगाव, कडेगाव, पलुस | ११ |
| | १४ | सातारा | सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा, महाबळेश्वर,पाटण, जावळी, वाई, कोरेगाव, कराड | ११ |
| | १५ | कोल्हापूर | पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा, चंदगड, शाहुवाडी, शिरोळ | ८ |
| छ. संभाजीनगर | १६ | छ. संभाजीनगर | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री | ९ |
| | १७ | जालना | बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद | ८ |
| | १८ | बीड | बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी | ११ |
| | १९ | लातूर | लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट | १० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २० | धाराशिव | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा | ८ |
| | २१ | नांदेड | नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहुर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव,मुदखेडा, मुखेड | १६ |
| | २२ | परभणी | पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी | ९ |
| | २३ | हिंगोली | हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत | ५ |
| अमरावती | २४ | बुलढाणा | जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा | १३ |
| | २५ | अमरावती | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | १४ |
| | २६ | अकोला | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शीटाकळी | ७ |
| | २७ | वाशिम | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा, मानोरा | ६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २८ | यवतमाळ | यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव | १६ |
| नागपूर | २९ | वर्धा | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी,कारंजा | ८ |
| | ३० | नागपूर | नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर | १४ |
| | ३१ | भंडारा | भंडारा, पवनी, लाखंदूर,मोहाडी व तुमसर | ५ |
| | ३२ | गोंदिया | तिरोडा,आमगांव,देवरी,सालेकसा व गोंदिया, अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी, गोरेगाव | ८ |
| | ३३ | चंद्रपूर | चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी, राजूरा, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा ,जिवती, ब्रम्हपूरी, व बल्लारपूर | १५ |
| | ३४ | गडचिरोली | गडचिरोली, चार्मोर्शी | २ |
| | | **एकूण तालुके** | | **३०५** |

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.10.14 12:57:34 +05'30'

**(सुनिल स. सामंत)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**